सं.फौ.ख.क्र. ८६८/२०२०
सरकार वि.सुनिल
नि.क्र.१२ च्या खाली

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–गणेश नारायणरावजी बिरे,
वय–२० वर्षे, व्यवसाय– शिक्षण.
राह. सोनेगांव लोधी, तह.जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

१. घटना दि.०६/१०/२०२० रोजी माझ्या घरी अंगणात दुपारी १.०० वाजता घडली होती. सदर दिवशी माझा मोठा चुलत भाऊ सुनिल बिरे हा माझ्या घराच्या अंगणात येउन माझ्या आईला 'तुझ्या पुदीचे कातडे काढीन, तु काय झाटा उपडल्या, रंडी, रांड, वेश्या, नाचणेवाली' अशा घाण शिवीगाळ करित होता. त्यावेळी तेथे माझे काका नामे विठ्ठलराव बिरे व मारोतराव बिरे असे हजर होते. माझ्या आईने आरोपीविरूध्द जुनी तक्रार दाखल केली होती त्यामुळे त्यावरून आरोपीने माझ्या आईला शिवीगाळ केली होती. आरोपी हा जुन्या वादावरून भांडण करायचा. आरोपी हा माझ्या आईला जिवे मारण्याची धमकी द्यायचा. त्यामुळे माझ्या आईने आरोपीविरूध्द रिपोर्ट दिली होती. मी पोलिसांना बयाण दिले होते. ज्या आरोपींनी माझ्या आईला शिवीगाळ केली त्यांना पाहिल्यास मी ओळखतो. आरोपी आजरोजी न्यायालयात गैरहजर. आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज नि.क्र.२७ वर दाखल, मंजुर, ओळखीबाबत तक्रार नाही.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. श्रीमती एन.के.सुभेदार यांच्यातर्फे उलटतपास सुरू.</u>**

**२.** आरोपीचे व माझे घर शेजारी–शेजारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या पुर्वीपासुनच आरोपीचे व आमचे बोलणे बंद होते. आमच्या घराच्या आजुबाजुला भरपुर लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या आईला कोणतीही शिवीगाळ केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमचे आपसात पटत नसल्यामुळे आरोपीला खोट्या केसमध्ये गोवले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी घटना घडली त्याच दिवशी माझ्या आईने फिर्याद दिली नव्हती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, घटनेच्या

पुढच्या दिवशी दिली, घटनेच्या दिवशी माझी आई अंगणात बसुन होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनाच घडली नाही त्यामुळे माझ्या आईने घटनेच्या दिवशी फिर्याद दिली नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, घटनेच्या वेळी मी प्रत्यक्ष हजर होतो.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत आमचे पटत नसल्यामुळे माझ्या आईने संगणमत करून घटनेच्या दुस–या दिवशी फिर्याद दिली. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, घटनेच्या दिवशी रात्री १०.०० वाजेपर्यंत शिवीगाळ व भांडण सुरू होते त्यामुळे रात्री फिर्याद द्यायला जाता आले नाही. आमच्या घरापासुन पो.स्टे. ७ किमी अंतरावर आहे, दुचाकीने गेल्यास २० मिनिटे पो.स्टे.ला जाण्यासाठी लागतात. माझ्या घरी दुचाकी वाहण आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि १६.०१.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड